# प्रेसनोट

नाशिक,
दि. ०७/०२/२०२३

**आलोसे क्र.१) आशा देवराम गोडसे, ग्रामसेविका, बलायदुरी ग्रामपंचायत, ता.इगतपुरी, जि.नाशिक, २) हिरामण पांडुरंग दुभाषे, सरपंच बलायदुरी ग्रामपंचायत, ता.इगतपुरी, जि.नाशिक ३) मल्हारी पंढरीनाथ गटकळ, खाजगी इसम रा. बलायदुरी, ता.इगतपुरी, जि.नाशिक यांनी ५०,०००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यान्वये कारवाई केले बाबत.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक | नाशिक |
| गुन्हा नोंद क्रमांक | कार्यवाही सुरु आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ अ,१२ प्रमाणे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | १) आशा देवराम गोडसे, ग्रामसेविका,बलायदुरी ग्रामपंचायत,ता.इगतपुरी, जि.नाशिक,<br>२) हिरामण पांडुरंग दुभाषे, सरपंच बलायदुरी ग्रामपंचायत, ता.इगतपुरी, जि.नाशिक<br>३) मल्हारी पंढरीनाथ गटकळ, खाजगी इसम रा. बलायदुरी, ता.इगतपुरी, जि.नाशिक |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५०,०००/- **रूपये** |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ५०,०००/- **रूपये** |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार हे ग्रामपंचायत बलायदुरी येथे शिपाई म्हणून नेमणुकीस होते. ते माहे जून-२०२० मध्ये सेवानिवृत्त झाले असून त्यांचे बलायदुरी ग्रामपंचायत येथे १६४,६८२/- रुपये राहणीमान भत्ता बिलाची रक्कम मिळणे बाकी होती. सदर राहणीमान भत्त्याच्या रक्कमेचा धनादेश बनवून देणेकामी **आलोसे क्र.१)** आशा देवराम गोडसे, ग्रामसेविका, बलायदुरी ग्रामपंचायत, ता.इगतपुरी, जि.नाशिक, व **२)** हिरामण पांडुरंग दुभाषे, सरपंच बलायदुरी ग्रामपंचायत, ता. इगतपुरी, जि.नाशिक यांनी तक्रारदार यांचेकडे ५०,०००/- रूपये लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक कार्यालयात तक्रार दिली.<br>सदर तक्रारीवरुन ला.प्र.वि. नाशिक पथकाने पडताळणी करून सापळा आयोजित केला असता सापळा कारवाई दरम्यान क्र.२) हिरामण पांडुरंग दुभाषे, सरपंच बलायदुरी ग्रामपंचायत, ता. इगतपुरी, जि.नाशिक व **आरोपी क्र.३)** मल्हारी पंढरीनाथ गटकळ, खाजगी इसम, रा.बलायदुरी,ता. इगतपुरी,जि.नाशिक यांनी तक्रारदार यांचेकडे ५०,०००/- रूपये लाचेची मागणी केली सदर लाचेची रक्कम देण्यासाठी **आलोसे क्र.१)**आशा देवराम गोडसे, ग्रामसेविका,बलायदुरी ग्रामपंचायत,ता. इगतपुरी,जि.नाशिक, यांनी प्रोत्साहन दिले असून **आलोसे क्र.२ व ३** यांनी मागणी केलेली सदर लाचेची रक्कम आज दि.७.२.२०२३ रोजी घोटी येथील जुना मुंबई - आग्रारोड वरील आर.के. टायर सर्व्हिस दुकानासमोर तक्रारदार यांचेकडून स्विकारल्याने त्यांना पकडण्यात आले असून तिघांविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ अ, १२ प्रमाणे गुन्हा नोंदविण्याची पुढील कार्यवाही सुरू आहे. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक येथे संपर्क करावा.

| | | |
|---|---|---|
| संपर्क पत्ता | :- | ला.प्र.वि. नाशिक परिक्षेत्र, नाशिक |
| संकेतस्थळ | :- | acbmaharashtra.gov.in |
| ई-मेल | :- | spacbnashik@mahapolice.gov.in |
| ऑनलाईन तक्रार | :- | acbmaharashtra.net |
| टोल फ्री क्रमांक | :- | १०६४ |
| दुरध्वनी क्रमांक | :- | ०२५३-२५७५६२८, २५७८२३० |
| व्हॉट्स ॲपक्र | :- | ९९३०९९७७०० |

पोलीस उपआयुक्त/पोलीस अधिक्षक अँन्टी करप्शन ब्युरो, नाशिक परिक्षेत्र, नाशिक

(नरेंद्र भा. पवार)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक